
दैनिक
# दिव्य मातृछाया
शनिवार, दि. १२ एप्रिल २०२५
बुलडाणा
● वर्ष : तृतीय ● अंक : ३५४ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711
www.matruchhaya.in
● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555

# 'मुलींची शाळा काढताना महात्मा फुलेंनी अनुकरण केले'

## खासदार उदयनराजे भोसलेंच्या विधानानंतर नाव वाद


● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**सातारा :** महात्मा जोतीराव फुले यांची १९८ वी जयंती (११ एप्रिल) आज राज्यभरात साजरी करण्यात आली. पुण्यातील फुले वाड्याला अनेक नेत्यांनी भेट देऊन महात्मा फुलेंना अभिवादन केले. साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले यांनीही यावेळी फुले वाड्यात हजेरी लावली होती. तसेच माध्यमांशी संवाद साधत असताना त्यांनी फुलेंच्या कार्याचा गौरव केला. "छत्रपती शिवाजी महाराजांचा समतेचा, सर्व धर्म समभावाचा विचार जोतीराव फुलेंनी लोकांपर्यंत पोहोचवला. तसेच त्यांनी मुलींची शाळा काढत असताना एकप्रकारे थोरले प्रतापसिंह यांचे अनुकरण केले", असे विधान उदयनराजे भोसले यांनी केले.

महात्मा फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत असताना उदयनराजे भोसले म्हणाले की, महात्मा फुले चांगले उद्योजक, अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी आयुष्यभर कष्ट करून जी संपत्ती गोळा केली, ती सर्व समाज सुधारण्याच्या कामाकरिता खर्च केली. महात्मा फुले यांनी एकप्रकारे थोरले प्रतापसिंह यांचे अनुकरण केले होते. सर्वात आधी स्त्री शिक्षणासाठी शाळा कुणी सुरू केली असेल तर ती थोरल्या प्रतापसिंहांनी साताऱ्याच्या राजवाड्यात केली होती.

दरम्यान उदयनराजे भोसले यांच्या या दाव्यावर अनेकांनी टीका केली. ओबीसी नेते लक्ष्मण हाके म्हणाले की, कुठलाही अभ्यास न करता किंवा इतिहास तज्ज्ञाचा सल्ला न घेता लोकसभेच्या खासदाराने अशी बेजबाबदार विधाने करू नयेत, असे आमचे मत आहे. महात्मा जोतीराव फुलेंची आज जयंती असताना खासदार इतके बेजबाबदार कसे काय वागू शकतात? याबद्दल मी त्यांचा निषेध करतो.

आणखी एक ओबीसी नेते मंगेश ससाणे यांनीही उदयनराजे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, आज फुलेंची जयंती असताना उदयनराजेंनी इथे येऊन त्यांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

### गार्गी नावाची महिला आधीच शिक्षिका

♦ काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत उदयनराजेंच्या विधानाचा समाचार घेतला. ते म्हणाले, महात्मा फुलेंचे अनन्यसाधारण योगदान आपल्या सर्वांना माहीत आहेच. पण इतिहासाची विनाकारण खोडसाळपणे छेडछाड करण्यात येत आहे. उद्या उठून कुणी म्हणेल की, पुराणातील गार्गी नावाची महिला आधीच शिक्षिका झाली होती.

# अवैध रेती तस्करी करणाऱ्या भरधाव टिप्परने ट्रेलरला दिली धडक

## समृद्धी महामार्गावरील घटना ; टिप्पर फरार





● दिव्य मातृछाया
● विशेष प्रतिनिधी

**मेहकर :** दि.11 एप्रिल समृद्धी महामार्गावरून अवैध वाहतूक राजरोसपणे नेहमी होतांना दिसते.रेतीतस्करी ही खुश्किच्या मार्गाने होतं असून त्यावर कोणाचेही कोणतेही अंकुश नसल्याने ही अवैध वाहतूक समृद्धी वरील वाहतुकीस बाधा ठरत असून एखाद्या वेळी ही वाहतूक कित्येकांचे प्राण घेवू शकते.

दि. 11 एप्रिलच्या सकाळी 8 वाजता दरम्यान अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परने खुश्किच्या मार्गातून वर चढत असतांना ट्रेलरला धडक मारून ट्रेलरचे नुकसान करून खुश्किच्या मार्गाने पळून गेल्याची घटना घडली. समृद्धी महामार्ग नागपूर कोरीडोर वरती चॅनल नंबर 298 वरती मुंबई कडून नागपूर कडे जात असलेला सी जी 07 सी व्ही 9086 या ट्रेलरला अचानक पणे एक रेतीचा टिप्पर हा खुश्किच्या मगर्गातून सरळ ट्रेलर समोर आला ज्याने ट्रेलरला धडक मारली त्यात ट्रेलर चे मोठे नुकसान झाले क्लीनर जखमी झाला त्या गडबडीत तो रेतीचा टिप्पर आला तसाच खुशकीच्या मार्गाने परत निघून गेला मात्र यात ट्रेलरची कॅबिन पूर्णपणे निकामी झाली तर क्लीनर जखमी झाला ज्याची माहिती महामार्ग पोलिसांना मिळताच त्यांनी महसूल विभागाला माहिती देवून रेतीच्या टिप्पर बद्दल माहिती दिली.

समृद्धी महामार्ग हा जलद गतीने प्रवासा साठी जितक्या प्रमाणात नवाजल्या गेला त्या पेक्षा ही जास्त प्रमाणात तो डिझेल चोरी,अवैध रेती वाहतूक, गुटखा वाहतूक, साठी प्रचलित झालेला असून कोणीही अडवणारा नसल्याने या मार्गाला प्रथम पसंती मिळत आहे.



♦ ट्रेलर होते म्हणून जीवितहानी झाली नाही त्या जागी तर प्रवासी वाहतूक करणारी लक्सरी वाहन किव्हा दुसरे एखादे वाहन असते तर मोठी जीवितहानी झाली असती समृद्धी महामार्ग वरून नियमित चालणाऱ्या वाहन चालकांचे म्हणणे आहे कि खुशकीचे मार्ग जर बंद होतं नसतील तर समृद्धी प्रशासनाने खुश्किच्या मार्गा जवळ बॅरिकेट लावून तसे सूचना फलक तरी लिहावे त्याने किमान चालक सावध होऊन वाहन चालवतील.

♦ समृद्धी महामार्गावर दर पाच किलोमीटर वरती इमर्जन्सि गेट आहेत एका लेन वरून दुसऱ्या लेनवर जाता येते ज्याने पोलीस,क्विक रिस्पॉन्स टीम, ऍम्ब्युलन्स, क्रेन या सारखी वाहने त्वरित मदत मिळवून देऊ शकतात मात्र सध्या हेच इमर्जन्सि गेट मधून रेती वाहतूक करणारे वाहन जात असल्यामुळे समृद्धीला वाली कोण असा प्रश्न निर्माण होतं आहे.

# साखरखेर्डा येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

## गावातून निघाली सकाळी मोटारसायकल रॅली तर दुपारी भव्य मिरवणूक



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**साखरखेर्डा :** येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी मोटारसायकल रॅली आणि दुपारी एक वाजता गावातील मुख्य रस्त्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

महात्मा ज्योतिबा फुले नगरातील श्रीराम मंदिरापासून मिरवणुकीला प्रारंभ झाला. महिलांनी घराबाहेर सडामार्जन करुन रांगोळ्यांच्या पायघड्या घातल्या होत्या. महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूजन करण्यात आले. वाजतगाजत मिरवणूक निघाली असताना अनेक सामाजिक, राजकीय नेत्यांनी पुष्पहार घालून स्वागत केले.

यावेळी श्री पलसिध्द महास्वामी मठाचे मठाधिपती सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज, ठाणेदार गजानन करेवाड, सरपंच ज्योतीताई अमित जाधव, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष राम जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ. स्नेहल रविंद्र पाटील, माजी सरपंच महेंद्र पाटील, कमलाकर गवई, रावसाहेब देशपांडे, संग्रामसिंह राजपूत, देवानंद खंडागळे यांनीसुध्दा पुष्पहार घालून अभिवादन केले. मिरवणुकीत व्हीकी जगताप, ग्रामपंचायत सदस्य दिलीप बेंडमाळी, माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य संतोष जैस्वाल, संदीप खिल्लारे, संपतराव दसरे, युवासेना तालुका प्रमुख संदीप मगर, वामन नाईक, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संतोष मंडळकर, मारोती मंडळकर, भागवत मंडळकर, गोपाल शिराळे यासह समाजातील हजारो युवक सहभागी झाले होते.

### वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

♦ सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्यावतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पूर्वसंध्येला १० एप्रिलरोजी शालेय १ ली ते ८ आणि युवकांची सामाजिक कार्यावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी आणि युवकांना बक्षिसाचे वाटप करण्यात आले. अ गटातील प्रथम बक्षीस समर्थ दानवे, व्दितीय रोहित बेंडमाळी, वरद झोरे, तृतीय भाग्यश्री मंडळकर तर युवक गटातील ब मधील रोहन अवचार, अनुराग नवले, आदित्य खराडे यांना देण्यात आले. परिक्षक म्हणून माजी प्राचार्य संतोष दसरे यांनी काम पाहिले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्ष राहुल जगताप नितीन इंगळे, संतोष मंडळकर, दिलीप बेंडमाळी, संपत दसरे, रवी जगताप उपस्थित होते. आभार हर्षल मंडळकर यांनी मानले.

# पाणी प्रश्न अन् एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारावरून आदित्य ठाकरे आक्रमक



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** पाणी पुरवठा करणाऱ्या टँकर संघटनेने संप पुकारला आहे. त्यामुळे गुरुवारपासून मुंबईत पाणी टँकरची सेवा बंद आहे. पाणी टँकरची सेवा बंद असल्यामुळे अनेक मुंबईकरांना पाण्याच्या समस्यांना समोरं जावं लागत आहे. तसेच दुसरीकडे राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा मुद्दा चर्चेत आहे. एसटी कर्मचाऱ्यांना ५७ टक्केच पगार देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

तसेच राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफीबाबतही कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे अशा विविध मुद्यांवरून शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. तसेच मुंबईतील पाणी प्रश्नाबाबत पुढील ४८ तासांत योग्य निर्णय सरकारने घेतला नाही तर शिवसेना ठाकरे गट मोठं आंदोलन करणार असल्याचा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

"मुंबईत पाणी पुरवठा करणाऱ्या टँकर संघटनेचा दोन दिवसांचा संप हा पुढे किती दिवस चालेल माहिती नाही. पण मी आवाहन करतो की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण असोसिएशनला भेट द्यावी आणि त्यांच्या ज्या काही मागण्या असतील त्या मागण्यांवर तोडगा काढावा. कारण मुंबईत किती दिवस पाण्याचा त्रास सहन करायचा. मुंबईत अनेक ठिकाणी खराब पाणी येतं, मुंबईकरांचे मला देखील अनेक मेसेज येतात. अशीच परिस्थिती अनेक ठिकाणी आहे, कारण टॅंकर असोसिएशने पाणी देणं बंद केलं आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पाणी नाही", असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

"दुसरा जो महत्वाचा विषय आहे तो म्हणजे एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराचा. महायुतीचं सरकार सत्तेत येईपर्यंत असं वाटत होतं की यांच्याकडे खूप पैसा जमा झाला आहे. मात्र, सत्य परिस्थिती अशी आहे की काही दिवसांपूर्वी बीएमसीच्या कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर आला नाही. आम्ही त्यासाठी लढा दिला तेव्हा त्यांचा पगार वेळेवर आला. आता एसटी कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर येत नाही. त्यांना फक्त ५७ टक्के पगार दिला जातोय. तुम्ही विचार करा या सरकारला सत्तेत येऊन सहा महिनेही झाले नाहीत तर अशी परिस्थिती आहे.

♦ "शेतकऱ्यांची कर्जमाफी, लाडकी बहीण योजनेबाबत दिलेले आश्वासन सरकारने पाळलं नाही. आता हे आश्वासने सोडा कर्मचाऱ्यांनाही अर्धा पगार मिळतोय. मग जेव्हा महाविकास आघाडीचं सरकार होतं तेव्हा एसटी कर्मचाऱ्यांना जे लोक रस्त्यावर आणत होते, ते लोक आज शांत का आहेत? ते लोक का सरकारला का सवाल विचारत नाहीत? आता मुंबईतील पाण्याच्या प्रश्नांची उत्तरे कोण देणार? एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत कोण उत्तरे देणार? मुंबईतील पाण्याचा प्रश्न जर पुढच्या ४८ तासांत सुटला नाही तर शिवसेना ठाकरे गट प्रत्येक वॉर्ड ऑफिसवर मोर्चा काढल्याशिवाय राहणार नाही", असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला.

# भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी



● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर :** दि. 11 एप्रिल 2025 रोजी थोर समाज सुधारक, क्रांतिसुर्य महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेहकर नगर परिषदेचे मा. नगराध्यक्ष कासम भाई गवळी हे होते.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मा. नगर सेवक तथा गटनेते मो. अलीम ताहेर, सुरेश मानवतकर,अलियार खान, प्रल्हाद पिटकर बुलढाणा जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हा उपाध्यक्षा अलका ताई लंबे तसेच युवा नेते किशोर धोंडगे, गजेंद्र माने, अनिल चांगाडे, प्रल्हाद कानोडजे, मनोज गोरे, कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक इब्राहिम गवळी, विजय देवडे, गणेश म्हस्के,शेषराव लंबे, महेबूब गवळी, अख्तर कुरेशी, सद्दाम गवळी राजू देबाजे, आसिफ पठाण, युनुस गवळी, अहेमद नूर गवळी सुभान चौधरी, लल्ला गवळी आणि काँग्रेस पक्षाच्या अनेक नेते पदाधिकारी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचालन गजेंद्र माने आणि विजय देवडे यांनी केले. शेवटी महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले.

♦ कार्यक्रमात सुरुवातीला महात्मा फुले यांच्या पुतळ्याला मान्यवराच्या हस्ते हार अर्पण करण्यात आले. या वेळेस अडव्होकेट किशोर धोंडगे, सुरेश मानवतकर, गजेंद्र माने सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# पत्नीची हत्या करुन पतिची आत्महत्या

## मंगरूळपीर तालुक्यातील पिंप्री येथील घटना, आत्महत्यस प्रवृत्त केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** मंगरूळपीर तालुक्यातील पिप्री खरबी येथील गौतम वर याने ता. 9 रोजी मध्यरात्री पत्नीची हत्या करून स्वतः दि 10 रोजी सकाळी ७ वाजता आत्महत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी उपरोक्त घटनेस कारणीभूत असल्याच्या आरोपावरून एका आरोपीविरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी रोशन गौतम वर, वय-२७ वर्षे, रा. ग्राम पिंपरी खरबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशीम हल्ली मुक्काम पंचशील नगर वाशीम, यांची आई ज्योती वर व संजय ठोके यांचे प्रेमसंबध असल्याचा राग मनात धरून व आरोपीत हा फिर्यादीचे वडीलांना धमक्या देत असे "तु ज्योतीला फारकत दे मला तिचेशी लग्न करायचे आहे". तसेच जिवे मारण्याचे धमक्या देत असल्याने फिर्यादीचे वडिलांनी संजय ठोके याचे त्रासामुळेच फिर्यादीची आई ज्योती हिला दिनांक ८ एप्रिल रात्री १०:०० ते दिनांक १०/ एप्रिल रोजी सकाळी ०७:०० वा दरम्यान रहाते घरी ग्राम पिंपरी खबरी ता. मंगरूळपीर येथे फि.चे आईला धारदार विळयाने व लोखंडी रॉडने डोक्यात मारून जखमी करून जिवे ठार मारले.

घराचे जवळच फि. यांचे वडीलांनी स्वतः शंकर ठाकरे यांचे शेतामधिल पत्रा शेडचे ॲगलला नॉयलॉन दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली. तरी संजय लक्ष्मण ठोके यांनी फिर्यादीचे वडीलांना फि.व. आईला जिवे मारण्याचे कृत्य करून आत्महत्या करणेस प्रवृत्त केले म्हणुन फिर्यादी यांनी आरोपी संजय लक्ष्मण ठोके रा. नविन सोनखास ता. मंगरूळपीर जि. वाशिम यांचे विरूध्द कायदेशीर तकार दिल्याने पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथे अपराध नोंद क्रमांक २३५/२०२५ कलम १०३(१), १०८, ३५१ (२), ३५१(३), भा.न्या. संहिता प्रमाणे गुन्हा नोंद असून सदर (Husband suicide Case) गुन्हयाचा पुढील तपास मा.पोलीस अधिक्षक सो श्री. अनुज तारे अप्पर पोलीस अधिक्षक, श्रीमती लता फड व उपविभागीय पोलीस अधिकारी मंगरूळपीर निलीमा आरज यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुधाकर आडे करीत आहेत.

# शेलुबाजार येथे भगवान महावीर जयंती साजरी



● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** दि 10 एप्रिल 2025 रोजी संपूर्ण देशभरात भगवान महावीर जयंती उत्सव साजरा होत असतो.शेलुबाजार येथे जैनांचे स्थान असून विविध धार्मिक कार्यक्रम साजरे होत असते.

♦ उत्साहात भगवान महावीर जयंती साजरी करण्यात आली व तसेच भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार व सामूहिक पूजन करण्यात आले उपस्थित आणि त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांचे कार्य सर्वांनी आत्मसात करण्याची अत्यंत गरज असून अनेक त्यांच्या कार्यावर चर्चा करण्यात आली व भगवान महावीर यांचा जन्म चैत्र महिन्याच्या पक्षातील त्रयोदशीला झाला हा दिवस जैन धर्मात महावीर जयंती म्हणून साजरा केला जातो.

भगवान महावीर जयंती निमित्त सर्वच मारवाडी राजस्थानी जैन समाज तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सुद्धा भगवान महावीर जयंती निमित्त आयोजित जैन स्थानक पासून ठीक 8.30 वाजता पासून ते संपूर्ण गावातून मुख्य बस स्टॅन्ड तसेच लक्ष्मीचंद शाळा तोडरवाल जैन कॉम्प्लेक्स अकोला रोड साई मंदिर पर्यंत भव्य भगवान महावीर यांच्या मूर्तीच्या रथाची मिरवणूक रॅली काढून समापन करण्यात आले.

महावीर जयंती हा जैन समाजासाठी एक महत्त्वाचा उत्सव असून चहूकडे जयंती साजरी करण्यात आली. सर्वच समाज बांधव पुरुषासह महिला व बालगोपाल उपस्थित राहून उत्साहात जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमात सर्वांचे सहकार्य लाभले तसेच शांततेत हा उत्सव साजरा करण्यात आला आणि प्रसाद सर्वांनी ग्रहण केला.

# वाशिम येथे भुमापन दिन साजरा



● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** भूमापन दिन दि.10 एप्रिल 2025 ला तहसील कार्यालय हॉल वाशिम येथे साजरा करण्यात आला.

त्याकरिता वाशिम जिल्ह्यातील सर्व कर्मचारी उपाधीक्षक भूमी वाशिम, मालेगाव, मंगरूळपीर मानोरा, कारंजा लाड तसेच श्रीकांत मुंडे प्रभारी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख वाशिम, नागरे ऊप अधीक्षक भूमि अभिलेख मालेगाव, उप अधीक्षक भूमि अभिलेख मंगरूळपीर कलावती जाधव, उप अधीक्षक भूमि अभिलेख वाशिम कुंजीर, आडे, उप अधीक्षक भूमि अभिलेख मानोरा, विनोद जाधव ऊप अधीक्षक भूमि अभिलेख कारंजा लाड यांचे उपस्थितीत पार पाडला.

# सहज प्रणाली : महसूल दस्तऐवज एका क्लिकवर

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा :** जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक जुने महसुली अभिलेख, प्रमाणपत्रासाठी वारंवार महसूल कार्यालयाला भेटी देतात. यामुळे नागरिकांचा वेळ व अनेक अडचणीला सामोर जावे लागत होते. परंतु आता सहज प्रणालीच्या माध्यमातून महसुल दस्तऐजव एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. या प्रणालीचा सर्व नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जुने महसुली अभिलेख जसे जुने नकाशे, भुसंपादन निवाडा प्रत, अकृषक आदेश, इनाम जमीन वाटप रजिस्टर,



जन्म-मृत्यू नोंद रजिस्टर, लवाद आदेश, नझुल प्रकरणे प्रमाणित प्रत, नक्कल अशा विविध महसूल दस्तावेजासाठी नागरिक अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालयात भेटी देतात. तथापि जुने महसुली अभिलेख शोधणे ही क्लिष्ट प्रक्रिया होती. तसेच जुने दस्ताऐवज जीर्ण झाल्याने उपलब्ध होण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे नागरिकांना सुलभपणे नक्कल मिळविण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येवर मात करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्हा महसुल प्रशासनांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखा, भूसंपादन शाखा, पुनर्वसन शाखा, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, तसेच सर्व तहसीलदार कार्यालय येथील जुने महसुली अभिलेख जतन करण्यासाठी व नागरिकांना सुलभ रितीने अभिलेख उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून अभिलेखाचे संगणकीकरण हा नाविन्यपूर्ण उपक्रम १ ऑगस्ट २०२४ या महसूल दिनांकापासून राबविण्यात आला. त्यानुसार जिल्हा महसूल प्रशासनाने एक सॉफ्टवेअर विकसित केले असून नागरिकांना आवश्यक दस्ताऐवज सदर प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रणालीमध्ये प्रकरणाचे वर्ष, पक्षकाराचे नाव, तालुका, गाव, निवाडा क्रमांक, गट क्रमांक ईत्यादी तपशीलाद्वारे शोधता येईल. सदर प्रणालीला सहज प्रणाली नाव देण्यात आले असून त्याचे लोकार्पण न्यायमूर्ती अनिल स. किलोर यांच्या हस्ते २३ मार्च रोजी करण्यात आले आहे.

सदर प्रणालीद्वारे शेतकरी व नागरिकांना आवश्यक असणारे दस्तऐवज, जुने महसुली अभिलेख निःशुल्क पाहता येणार आहे. आवश्यक दस्तऐवजाची प्रमाणित प्रत विहीत शुल्क ऑनलाइन प्रणालीद्वारे भरून जिल्हाधिकारी कार्यालय येथील अभिलेख कक्ष व तहसीलदार कार्यालयातील अभिलेख कक्षातून सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून घेता येणार आहे.

### प्रणालीचे फायदे

♦ जमीन दस्ताऐवजांची विनाविलंब उपलब्धता, नागरिकांच्या वेळेची व पैशाची बचत, एआयचा वापर असल्याने कामकाजात सुलभता, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासन, शेतकऱ्यांना न्यायालयीन व अर्ध न्यायिक प्रकरणांमध्ये मदत, विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यास सुलभता, महसुली प्रशासनातील कार्यक्षमतेत गतिमानता, अभिलेख्यांचे कायम स्वरुपी जतन होणार आहे.

# पाण्यासाठी अनसिंग येथील नागरिकांचे ग्राम पंचायतला निवेदन

## तीन दिवसात पाणी पुरवठा न केल्यास घागर मोर्चा काढण्याचा इशारा



● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** अनसिंग येथील प्रभाग क्रं. 4 सिताबर्डी प्लॉट येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याने त्यांनी दि. 11 एप्रिल रोजी ग्राम पंचायत निवेदन देवून नियमीत व सुरळीत पाणी पुरवठा करण्याची मागणी केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक 4 सिताबर्डी प्लॉट येथे गेल्या कित्येक दिवसापासुन नळाला व विहीरीला ग्राम पंचायत मार्फत पाणी पुरवठा केला जात नसल्यामुळे पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.

पाच वर्षा अगोदर सौ. सिंधुताई सातव यांच्या कार्यकाळात अनसिंग नागरीकांना पाण्याचा कुठल्याची प्रकारचा त्रास झाला नाही तसेच त्याप्रमाणे सुरळीत पाणीपुरवठा अनसिंगच्या नागरीकांना कधी होणार? असा प्रश्न उपस्थित करुन पाणी पुरवठा सुरळीत करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

येत्या तीन दिवसात पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरु केल्यास ग्राम पंचायतवर घागर मोर्चा काढणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर विलास तुकाराम राठोड, यश सतिश चव्हाण यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महात्मा फुले यांनी केलेले कार्य अजरामर

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने महात्मा फुले यांना अभिवादन

● दिव्य मातृछाया
● दे.राजा प्रतिनिधी

**देऊळगाव राजा :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीदिनी फुल पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे यांनी म्हटले की, ज्ञान आणि बुद्धिमत्तेवर विशिष्ट एकाच समाजाची पकड असावी, ही हजारो वर्षाची तथाकथित परंपरा सर्वात आधी मोडीत काढणारे जे कोणी असतील त्यामध्ये सर्वात पहिले नाव म्हणजे महात्मा फुले यांचेच आहे. जातीव्यवस्था, भेदभाव आणि स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक या विरोधात महात्मा फुले यांनी केलेले कार्य अजरामर आहे.

राष्ट्रवादीचे नेते गणेश सवडे यांनी आपले विचार मांडताना म्हटले की, महात्मा फुले यांचे कार्य कोण्या एका जातीसाठी नसून संबंध मानव जातीला न्याय देणारे होते. एखाद्या महिलेचा पती वारल्यानंतर तिच्या डोक्यावरचे केस उपटून काढले जायचे, ही अतिशय विकृत पद्धत समाजातील एका घटकात रूढ झाली होती. त्याला विरोध हा महात्मा फुले यांनीच केला. स्त्रियांना शिक्षण द्यायचे नाही, हा जर कर्मकांडातील आदेश होता, त्याला पहिला हादरा फुले दापत्यांनी दिला.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शहराध्यक्ष विजय खांडेभराड यांनी केले.

देऊळगाव राजा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रथम महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रंगनाथ कोल्हे, गजानन पवार,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे, शहराध्यक्ष विजय खांडेभराड, राष्ट्रवादीचे नेते गणेश बुरकुल, महेश देशमुख, माजी नगराध्यक्ष विष्णू रामाने, विलास खराट, नरोडे सर, गौरव वायाळ, नवनाथ गोमदरे, रफिक भाई, किसन नागरे, जनार्धन मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान अनेक मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कायार्लयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादिवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# मांसातुन विषबाधा होवुन दोन बिबट्यांचा संशयास्पद मृत्यूप्रकरणी एकास अटक



- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**बुलढाणा :** बुलढाणा वन परिक्षेत्रातील गिरडा, गुम्मी जनुना शिवार परिसरातील दाट जंगलात बिबट्यांसह विविध जंगली प्राण्यांचा अधिवास आहे.

बुलढाणा तालुक्यातील जनुना-गुम्मी शिवारात मागील एका महिन्यापूर्वी दोन बिबटयांचा संशयास्पद मृत्यू झाला होता.यामुळे खळबळून जागे झालेल्या वन विभागाने वेगाने तपास चक्रे फिरविली. या दोन बिबटयाच्या संशयस्पदरित्या बिबट्यांचा मृत्यू प्रकरणी वन विभागाने बुलढाणा तालुक्यातील गुम्मी गावातून एका इसमास अटक केली आहे.त्याची कसून चौकशी करण्यात येत त्या आधारे घटनेचा तपास करण्यात येत आहे. या बिबट्यांना मटणातून विष कालवून ठार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या घटनेत आणखी काही आरोपी असल्याची दाट शक्यता असून वन विभाग कर्मचाऱ्यांचे पथक त्या दृष्टीने तपास करीत आहे.

बुलढाणा वन परिक्षेत्रातील गिरडा, गुम्मी जनुना शिवार परिसरातील दाट जंगलात बिबट्यांसह विविध जंगली प्राण्यांचा अधिवास आहे. यातील जनुना, गुम्मी शिवारात कमी अधिक एक महिन्यापूर्वी दोन बिबट्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची खळबळजनक माहिती समोर आली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वन विभागाने वेगाने तपास सुरु केला.

पुढील तपासात काही पुरावे हाती येऊन वन विभागाने बुलढाणा तालुक्यातील गुम्मी येथील रहिवासी आरोपी सुनिल रामदास दांडगे( वय ३५ वर्षे याला अटक केली आहे. तसेच वन विभागाच्या तपास चमुने जनुना गाव शिवार परिसरातून बिबट्याची हाडे जमा केली होती. त्यानंतर तीहाडे उच्च स्तरीय तपासणी करीता पाठविण्यात आली.

प्राथमिक तपासणी अहवालातून या बिबट्यांना, बकऱ्याच्या मटनातून विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी वनविभागाच्या चमुने गुम्मी येथील सुनिल रामदास दांडगे याला अटक केली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता आरोपीचे आणखी काही साथीदार आहेत का, त्यांनी नेमके काय केले याचा शोध घेण्याच्या दृष्टीने तपास करण्यात येत आहे. आज शुक्रवारी अकरा एप्रिल रोजी आरोपी सुनिल दांडगे यास सोबत घेऊन वन विभागाची चमु पुढील तपास करीत आहे.

### जिल्हा क्रीडा संकुल परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात तीन वासरे ठार

- सुनिल दांडगे याने विषारी औषध टाकून बिबट्यांना का मारले ? यामागे तस्करी की, इतर काही कारण आहे का ? याचा शोध घेतला जात आहे. काही गावकऱ्यांच्या मते दांडगे यांच्या बकऱ्यांना बिबट्याने मागील काळात शिकार करून ठार केले होते. त्याचाच राग म्हणून दांडगे यांनी बिबट्यांना मारण्याचे पाऊल उचलले अशीही चर्चा आहे.तपासात याचा उलगडा होण्याची दाट शक्यता आहे. बुलढाणा शहराच्या सीमेवरील जिल्हा क्रीडा संकुल परिसरात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात तीन वासरे ठार झाल्याचे वृत्त आहे.
- काल, गुरुवारच्या मध्यरात्री बिबट्याने गोठ्यातील जनावरांवर हल्ला चढवून तीन वासरांचा फडशा पाडला. क्रीडा संकुलच्या भिंतीला लागून दुर्गादास काळे यांचा गोठा आहे. या गोठ्यात जवळपास विस गुरे ढोरे आहेत. आज सकाळी शेतकरी काळे जेव्हा गोठ्यात नित्यानेमाने पोहोचले तेव्हा दोन वासरू मृतावस्थेत आढळले. एका वासराचे पोट फाडलेले तर इतर दोन वासरांचे गळे चावलेले होते. बिबट्याने गोठ्यावर हल्ला केल्याचे स्पष्ट होते.

वासरांना खुंटीला बांधलेले असल्यामुळे बिबट्याला आपली शिकार नेता आली नाही. सदर गोठा गायकवाड ले आऊट मधील रामलक्ष्मी नगर मध्ये आहे. या परिसरात अनेकांनी घरे बांधली आहेत. उन्हाची तीव्रता वाढल्याने बिबट्यांनी नागरी वस्तीकडे पाऊले वळविल्याचे सदर प्रकरणातून अधोरेखित होत आहे. परिणामी क्रीडा संकुल परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. वनविभागाला सदर घटनेबाबत कळविण्यात आले आहे.

# शिवतेज प्रखर करण्यासाठी क्रांतीसूर्यांचा लढा अतुलनीय

## स्वराज्याची ज्वाला पुनर्जीवित करण्याची संकल्पना सत्यशोधकीय ; क्रांतीसुर्यांना चर्चासत्रातून विविध संघटनांचे सामूहिक अभिवादन



- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**बुलढाणा :** शिवतेज प्रखर करण्यासाठी क्रांतीसुर्यांचा लढा अतुलनीय आहे. छत्रपती शिवरायांचा विचार, वारसा, शौर्य छत्रपतींच्या समाधी नंतरआपल्या जगासमोर आला. स्वराज्याची विचार ज्वाला सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जगासमोर आणणारे महात्मा फुले क्रांतीसुर्य झाले. असे मत शिवव्याख्याते ॲड सतीशचंद्र रोठे पाटील यांनी व्यक्त केले.

बुलढाणा येथील महात्मा फुले शॉपिंग कॉम्प्लेक्स या ठिकाणी क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त चर्चासत्र आणि अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमानातून सायंकाळी करण्यात आले होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रबोधनकार शिवव्याख्याते ॲड रोठेनी उपरोक्त विचारांनी क्रांतीसुर्यांना मानवंदना दिली.

परिवर्तनवादी विचारवंत राजेश व्ही चव्हाण, यांच्या अध्यक्षतेत तर सत्यशोधकीय विचारवंत शांताराम धुरंदर, सुभाष भागिले, सामाजिक कार्यकर्ते तथा कोऱ्हाळा उपसरपंच गजानन बोडखे, अखिल भारतीय संत रविदास समता परिषदेचे कार्याध्यक्ष इंजि.शिवाजी जोहरे,रमाई ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सुरेखाताई निकाळजे, शिवव्याख्याते संजय राका, शिवव्याख्याते ॲड.सतीशचंद्र रोठे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला सामूहिक पुष्पहार,पुष्प अर्पण करून चर्चासत्राला सुरुवात करण्यात आली.

यावेळी ऍड प्रतीक देखणे, सतीश हिवरकर,विशाल धुरंदर, रमाकांत धुरंदर, नंदू धुरंदर,संदीप धुरंधर, श्रीकृष्ण धुरंदर, सागर धुरंदर, आशाबाई गायकवाड, पंचफुलाबाई गवई, जिजाबाई इंगळे,संजय येडोले, महेश तायडे, योगेश तायडे, निखिल राणे, सचिन चिटवार आदींनी चर्चासत्रात सहभाग घेत अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

सत्यशोधकीय विचारमंच, क्रांतीसुर्य युगप्रवर्तक प्रतिष्ठान, रमाई ब्रिगेड, किसान ब्रिगेड, मातृतीर्थ रणरागिणी संघटना, राणी लक्ष्मीबाई ब्रिगेड, आझाद हिंद महिला संघटना, महानायक विचारमंच, फुले शाहू आंबेडकरी फोरम, आझाद हिंद शेतकरी संघटना, महात्मा फुले शॉपिंग कॉम्प्लेक्स व्यावसायिक संघटना यासह जिल्ह्यातील महात्मा फुले क्रांतीसुर्य विचार कार्यावर कार्य करणाऱ्या संघटनांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत,यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने क्रांतीसूर्यांना मानवंदना देत चर्चासत्राचा समारोप करण्यात आला.

### चर्चासत्रातील सूर...


- महात्मा फुलेंच्या त्याग आणि समर्पणामुळे छत्रपती शिवरायांचा इतिहास नव्याने जगासमोर आला. छत्रपती शिवरायांची समाधी क्रांतिसूर्यांनी शोधली आणि शिव विचारांचा गजर जगात गुंजला. मुळात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले सत्यशोधकीय विचारांना गतिमान करणारे होते. अंधश्रद्धा आणि अविद्येच्या खाईतून समाजाला काढण्यासाठी प्रथम पुढाकार क्रांतीसूर्यांनी घेतला. तोच सत्यशोधकीय क्रांतिकारी विचारांचा वसा नंतर शाहू महाराज, डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी वृद्धिंगत केला. थोर समाजसेवी, क्रांतीसुर्य महात्मा फुले स्त्रियांच्या उद्धाराचे कैवारी सुद्धा झाले. त्यामुळेच आज महात्मा ज्योतिबा फुलेंना क्रांतीसुर्य म्हणून जगाने स्वीकारले. असा एकंदरीत चर्चासत्रातील अभ्यासपूर्ण मनोगतातून समोर आला.

# सहाविच्या विद्यार्थ्यांचा ऊष्माघाताने मृत्यु? शेगाव येथील घटना

- दिव्य मातृछाया
- सागर सिरसाट

**शेगाव :** शेगाव येथील एका विद्यार्थ्याची उष्माघाताने गेल्याची जोरदार चर्चा शेगावात होत आहे. संस्कार सोनटक्के असे या विध्यार्थ्याचे नाव असून ११ वर्षीय विद्यार्थी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराज ज्ञानपीठ मध्ये इयत्ता सहावीमध्ये शिकत होता.

शेगाव मधील एका विद्यार्थ्याचा बळी उष्माघाताने गेल्याची जोरदार चर्चा शेगावात होत आहे. संस्कार सोनटक्के असे या विध्यार्थ्याचे नाव असून ११ वर्षीय विद्यार्थी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराज ज्ञानपीठ मध्ये इयत्ता सहावीमध्ये शिकत होता. यामुळे आरोग्य यंत्रणेसह जिल्हा प्रशासन



देखील हादरले आहे. संस्कार सोनटक्के या विद्यार्थ्याला उन्हाचा फटका बसला. त्यात त्याची तब्येत गंभीर झाली असता उपचारासाठी त्याला अकोला येथे घेऊन जात असताना वाटेतच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यात उष्मघाताचा पहिला बळी गेला आहे बुलढाणा जिल्ह्यात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून त्याचा थेट फटका हा शाळकरी विद्यार्थ्यांना बसत आहे. शेगाव मधील तापमान एप्रिल महिन्यात चाळीस अंशांच्यावर असते. कोवळ्या वयाच्या संस्कारला या प्रखर उन्हाचा फटका बसल्याचे समजते.

तेथील उपचार नंतर त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. त्यामुळे संस्कार सोनटक्के याला शेगाव शहरातीलच मोठ्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र तरीही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने अकोला येथील एका सुपर स्पेशालिटी रुग्णालयात भरती करण्यासाठी नेत असतानाच त्याचा मृत्यू झाला. जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य विभागाने मात्र संस्कार सोनटक्के याचा मृत्यू मेंदूज्वर मुळे झाला असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला आहे. त्याला प्रारंभी ' व्हायरल इन्फेकशन ' झाले होते, नंतर ताप मेंदूत गेल्याने संस्कारचा मृत्यू झाला आहे. जिल्हा आरोग्य विभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी ही माहिती दिली.

### प्रशासन म्हणते...

- यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष कडे कुठलीही माहिती नसल्याचे दिसून आले. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडे देखील माहिती नसल्याचे सांगण्यात आले आहे. यासंदर्भातील माहिती जिल्हा आरोग्य विभाग आणि आरोग्य यंत्रणाकडून घेण्यात येत असल्याचे जिल्हा आपत्ती कक्षाच्या वरिष्ठ सूत्रांकडून सांगण्यात आले.दरम्यान, खामगाव व शेगाव शहरातील वरिष्ठ महसूल विभाग सूत्रांनी या घटनेचा अप्रत्यक्ष पणे दुजोरा दिला. या सूत्रांनी सांगितले की, संस्कार सोनटक्के हा संत गजानन महाराज ज्ञानपीठमधून दोन दिवसांपूर्वी घरी आला. त्यावेळी संस्कार सोनटक्के याला ओकारी झाली. यामुळे संस्कार याला शेगाव येथील एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले.

# सिंदखेडराजा तहसील कार्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

## थोर समाजसुधारकांच्या विचारांना मानाचा मुजरा !



- दिव्य मातृछाया
- सुरेश हुसे

**सिंदखेड राजा :** थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ व शेतकरी हितचिंतक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती सिंदखेडराजा तहसील कार्यालयात आज ११ एप्रिल रोजी अत्यंत उत्साहात व सन्मानपूर्वक साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. प्रवीण वराडे (नायब तहसीलदार) होते. यावेळी कमल लहाने (महसूल अधिकारी), सुनिता रोकडे, संजय सोनुने (महसूल सहाय्यक), रामेश्वर कहाळे, व्ही.आर. भागीले, गणेश नागरे, मनोज झिने, मनोहर चेके, जानकिराम शिपे, व्ही.जे. पडघान, एस.बी. चिभडे, अनंता वाटोरे, दत्ता बनकर, शिवाजी शिंदे, संजय आटोळे (महसूल सेवक) आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात महात्मा फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या सामाजिक क्रांतीकारी कार्याचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या विचारांना अनुसरून समाजसेवा, शिक्षण आणि समतेचा मार्ग अवलंबण्याचा संकल्प केला.

# छत्रपती अर्बन पतसंस्थेत महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी

- दिव्य मातृछाया
- दे.मही प्रतिनिधी

**देऊळगाव मही :** छत्रपती बिगर शेती सहकारी पतसंस्था देऊळगाव मही येथे समाजातील विषमता दूर करून समतेचे बिजारोपण करणारे, स्त्री शिक्षणाचे कैवारी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधत त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष छत्रपती अर्बन पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा सभापती समाधान शिंगणे होते. सर्वप्रथम क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून



पुष्प पूजन करण्यात आले.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी ज्याप्रकारे मागासलेल्या समाज व्यवस्थेत कार्य करून महिलांना समानतेचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी जो संघर्ष केला. तो संघर्ष तुम्ही आम्ही डोळ्यासमोर ठेऊन समाजहिताठी लढलं असे मनोगत व्यक्त करतांना सभापती समाधान शिंगणे यांनी उदगार काढले. यावेळी पोलीस पाटील रंगनाथ शिंगणे, तंटामुक्ती अध्यक्ष भास्कर शिंगणे, पतसंस्थाचे उपाध्यक्ष पंढरीनाथ कुटे, संचालक एकनाथ बापू शिंगणे, रतन रेशवाल, सुभाष इंगळे, राम प-हाड,सुनील महाराज शिंगणे,पत्रकार संतोष जाधव, विशाल उबरहंडे, भगवान चंद, सतिश शिंगणे, अमोल बोबडे, गणेश शेळके, व्यवस्थापक पुरषोत्तम शिंगणे, नितीन खिल्लारे, संतोष चेके, अमोल गुरव, रघु शिंगणे, रविंद्र पन्नासे, झिने आदी उपस्थित होते.

# समृध्दी महामार्गावर भिषण अपघात दोन ठार 4 जखमी

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मेहकर दि.11 एप्रिल :** वाशीम येथील चंदनशिव पारिवार हा देव दर्शन साठी गेला असता समृद्धी वरीन घरी परत येत असतांना काळाने घाला घातला पिता पुत्र मृत झाले तर परिवारातील तीन सदस्य व चालक गंभीर जखमी झाल्याची घटना 11 एप्रिलच्या सकाळी 3 वाजता दरम्यान घडली.

पूजा रतन चंदनशिव वय 29 वर्षे, राणी गोपाल चंदनशिव 31 वर्षे, अर्चना रतन चंदनशिव वय 68 वर्षे व चालक शिवाजी इडोळे गंभीर जखमी हे कुटुंब देवदर्शन घेऊन घराकडे वाशिम ला जात होते अश्यात त्यांचा अपघात झाला यात मृतकाला मेहकर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले तर गंभीर जखमी 4 लोकांना संभाजीनगर येथे उपचारासाठी पाठवण्यात आले.या वेळी महामार्ग पोलीस व डोणगाव पोलिसांनी घटनास्थळी पोचून जखमीना तात्काळ ॲम्ब्युलन्स द्वारे रेफर केले व क्रेन द्वारे वाहन उचलून वाहतूक सुरळीत केली या वेळी पोलीस निरीक्षक शैलेश पवार, मुकेश जाधव,विष्णू कोलांडे, पो का सानप हे व क्विक रिस्पॉन्स टीम सुद्धा हजर होती.




**अपघातातील मृतक हे पिता पुत्र**

♦ मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावर 11एप्रिलला सकाळी तीन वाजताच्या दरम्यान अपघात होऊन त्या मध्ये दोन जण ठार झाले आहेत. डोणगाव जवळ असलेल्या समृद्धी महामार्ग चॅनल क्र. 268. 600 जवळ नागपुर कडे जाणारी ईर्टीगा क्र. MH 11 CQ8566 हे वाशीम कडे जात असताना समोरून जाणाऱ्या ट्रक क्र RJ29 GB2820 ला मागून धडक दिल्याने सदर ईर्टीगा कार मध्ये असणारे वाशिम येथील रतन चंदनशिव वय 55 वर्षे व मुलगा गोपाल चंदनशिव वय 35 वर्षे हे पिता पुत्र जागीच ठार झाले.

## मेहकर कांग्रेसच्या वतिने महात्मा ज्योतीबा फुले जयंती साजरी



● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर दि ११ एप्रिल :** रोजी मेहकर येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मेहकर कांग्रेसच्या वतिने महाराष्ट्र प्रदेश कांग्रेसचे सरचिटणिस श्यामभाऊ उमाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली.

सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याला हार-पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाला माजी नगर सेवक उस्मानभाई शाह,कांग्रेस नेते नारायणजी पचेरवाल, युवक कांग्रेस शहर अध्यक्ष रियाज कुरेशी, कांग्रेस असंगठित शहर अध्यक्ष छोटुभाई गवळी, ओबीसी विभाग जिल्हा सरचिटणिस शाहुभाई गवळी,अशोकजी इंगळे सर, ॲड गोपाल पाखरे, युवक कांग्रेस महासचिव आशुतोष तेलंग, अरुणजी वानखेडे, मुनाफभाई खान, गजानन पायघन, पिरु गवळी,आफताब कुरेशी, आश्रुजी मानवतकर, शेख मतिन, शोएब कुरेशी, यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अल्पसंख्याक विभागाचे शहर अध्यक्ष युनुस पटेल, तर आभार नारायण इंगळे यांनी केले.

# बळीराजाची शेती सुजलाम सुफलाम झाली पाहिजे : जयचंद बाठीया

## बीजेएसच्या संकल्पनेतून दे . माळी येथे गाळ उपसा मोहिमेचा शुभारंभ

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मेहकर :** शेतक-यांच्या शेतीसह मेहकर तालुक्यातील प्रत्येक गावात सुजलाम-सुफलाम करण्याचा शुभ संकल्प भारतीय जैन संघटनेने घेतला आहे.पूर, महापूर आणि भूकंप-त्सुनामी यासारख्या नैसर्गिक आपत्तीसोबतच आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबियांना मदतीचा हात देण्यासाठी भारतीय जैन संघटनेचा सदैव पुढाकार राहीला आहे.

भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा यांच्या नेतृत्वात समाजातील प्रत्येक घटकाच्या मदतीला धावून जाणार्या भारतीय जैन संघटनेने आता राज्य दृष्काळमुक्त करण्यासाठी सिंचनावर भर देण्याचा संकल्प मागील पाच वर्षांपूर्वीच घेतला असून या मोहिमेतंर्गत राज्यातील १७५ तालुक्यातील नदी, नाल्यांसोबतच शेत रस्त्याच्या कडेला असलेल्या गाळाचा उपसा करण्यात येईल. या मोहिमेत जिल्ह्यातील आमच्या सर्व जैन समाजाबांधवासोबतच इतरही मान्यवरांची मदत लाभणार असून बीजेएस संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा यांनी राज्यातील बळीराजाची शेती सुजलाम सुफलाम करण्याचा शुभ संकल्प केला असून त्या दृष्टिकोनातून मागील पाच वर्षापासून बुलढाणा जिल्ह्यातील संपूर्ण 13 तालुक्यात बीजेएस काम सुरू आहे.

काही वरिष्ठ अभियंत्यांसह, अभियंता आणि संबंधीत क्षेत्रातील तज्ज्ञांचीही निवड यापूर्वी या मोहिमेमध्ये करण्यात आली आहे. दे.माळी आणि परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीला सुजलाम सुफलाम करण्यासाठी बिजेएसच्या माध्यमातून जास्तीत जास्त गाळ आपल्या शेतात टाकावा असे आवाहन यावेळी मेहकर तहसील चे ना तहसीलदार अजय पिंपरकर, नगर पालिकेचे उपाध्यक्ष जयचंद बाठिया यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार अजय पिंपरकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून कैलास सोनुने, मेहेत्रे साहेब, जाधवसाहेब कुलाल साहेब, हे कृषी व महसूल चे शासकीय अधिकारी उपस्थित होते त्याचबरोबर सरपंच किशोर गाभणे, वसंतराव मगर, पांडुरंग संस्थेचे अध्यक्ष बाबुराव बळी, ठाणेदार व्यंकटेश आलेवार साहेब भारतीय जैन संघटनेचे जिल्हा अध्यक्ष मंगलचंद कोठारी,ता.समन्वयक जयचंद बाठिया माजी न .प. उपाध्यक्ष मेहकर, नवलचंद दुगड, निलेशजी नाहटा, दिलीप गोठी, रवि मुणोत, राजेश जैन, यांच्यासह, माजी सरपंच सुभाष मगर, अशोक गाभणे, प्रकाश गाभणे, सुरेश जाधव, रवींद्र मगर, पत्रकार कैलास राऊत, पांडुरंग संस्थानचे सर्व विश्वस्त, राजेश मगर, किसनराव बळी, उपसरपंच रंगनाथ चाळगे, ग्रामपंचायत कार्यालयाचे सर्व सदस्य कर्मचारी, यास गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेशजी नहाटा यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार डॉ. शिवशंकर बळी यांनी मानले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महसूल चे कर्मचारी तरुण शर्मा, व ग्रामपंचायत सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### शास्त्रशुध्द आणि तांत्रिक पध्दतीने ही मोहिम

♦ बीजेएस संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा यांची हिमालयाच्या एवढे उंचीचे काम आम्हाला प्रेरणा देते असे प्रतिपादन 10 एप्रिल 2025 रोजी देऊळगाव माळी ता.मेहकर येथे बिजेएसच्या माध्यमातून गाळ उपसा मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून निलेश नाहटा जयचंद बाठीया पुढे बोलताना म्हणाले की अतिशय शास्त्रशुध्द आणि तांत्रिक पध्दतीने ही मोहिम राबविण्यासाठी सबंधीत क्षेत्रातील तांत्रिक सल्लागारांची मदत आम्ही घेत आहोत.

### पांडुरंगाच्या शेतात टाकला गाळ

♦ दे.माळी गावाचे ग्रामदैवत पांडुरंग संस्थान च्या शेतामध्ये सर्वप्रथम गाळ टाकून या योजनेचा शुभारंभ करण्यात आला यावेळी बिजेएसचे सर्व पदाधिकारी,पांडुरंग संस्थानचे अध्यक्ष बाबुराव बळी सर्व विश्वस्त व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापुरुषांचे विचार आचरणात आणले तरच जयंती पुण्यतिथी सार्थकी लागतील – प्रतापराव जाधव





● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर दि.11 एप्रिल रोजी :** सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक चळवळ गतिमान केली. त्यांच्या ' शेतकऱ्यांचा आसूड ' यासह इतर वाङ्मयीन लेखनामुळे क्रांतिकारी कार्य झाले. सर्व महापुरुषांचे विचार आचरणात आणले तरच जयंती पुण्यतिथी सारखे उत्सव सार्थके लागतील, असे विचार केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले सत्यशोधक चळवळ आणि समता परिषदेच्या वतीने आज महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी उद्यानात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार संजय रायमुलकर होते. प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

रफिक कुरेशी, गजानन पायघन, श्रीकृष्ण जुमडे, अमोल इंगळे, कुडके, शिवाजी इंगळे, मधुकर निकम यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. आपल्या भाषणात माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, सामाजिक विषमतेचे समतेमध्ये रूपांतर करून समाजाला नवी दिशा देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले.

महिलांच्या उत्कर्षासाठी सावित्रीबाई फुले यांनी आपले आयुष्य वेचले व एक आदर्श निर्माण केला. महापुरुषांचे महान कार्य आणि विचार अखिल माने मानव जातीला पुढे नेतात ,असेही ते म्हणाले. यावेळी सारंग तायडे यांनी आपल्या व्याख्यानात महात्मा फुले यांच्या कार्याची महती वर्णन केली. यावेळी विजय फंगाळ यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन राजेश मगर यांनी केले आणि आभार मानले.

♦ शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, शहरप्रमुख जयचंद बाठीया, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती आशाताई झोरे, युवा सेनेच सेनेचे जिल्हाधक्ष ऋषिकेश जाधव, तालुकाप्रमुख भूषण घोडे, समता परिषदेचे जिल्हा सरचिटणीस अशोक इंगळे, भीमशक्तीचे भाई कैलास सुकदाने, नीरज रायमुलकर ,विजय मोरे, नितीन राऊत, रविराज रहाटे, संदीप पांडव, विनोद पह्याड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

# रताळी येथील ई-क्लास जमिनीवरील अतिक्रमण प्रकरणी उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांची प्रत्यक्ष पाहणी

### अनुसुचीत जाती–जमाती आयोगाची तत्परता

● दिव्य मातृछाया
● सुरेश हुसे

**सिंदखेड राजा :** तालुक्यातील रताळी गावातील ई-क्लास जमिनीवरील अतिक्रमणाच्या तक्रारीची अनुसूचित जाती-जमाती आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. यासंदर्भात आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी रताळी गावाला भेट देऊन सदर प्रकरणाची सविस्तर पाहणी केली.

गावातील पंचफुलाबाई भिमराव जाधव व इतर तक्रारदारांनी आयोगाकडे शासनाच्या ई-क्लास जमिनीवर अतिक्रमण झाल्याची तक्रार केली होती. याच जमिनीवर सौर कृषी वाहिनी प्रकल्प राबविण्याचे नियोजन असून काम प्रगतीपथावर आहे. तथापि, अतिक्रमण झाल्याने स्थानिकांनी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

या पाहणीवेळी अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी, तहसीलदार अजित दिवटे, सरपंच उषा पाटील, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



♦ यावेळी उपाध्यक्ष मेश्राम यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेतले आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की,संबंधित कागदपत्रांची नियमांनुसार तपासणी करण्यात यावी, अतिक्रमण झालेल्या जमिनीबाबत तात्काळ अहवाल तयार करून आयोगास सादर करावा, तसेच, तक्रारदारांना पर्यायी जमीन उपलब्ध होऊ शकते का, याची चौकशी करण्यात यावी. तोपर्यंत प्रकल्पाचे काम स्थगित ठेवण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

## ३ कि.मी.चा रस्ता की मृत्यूचा सापळा ? मेंडगाव ते सावखेड नागरे रस्त्याची भयावह अवस्था, प्रशासनाला झोप लागलेलीच का ?

● दिव्य मातृछाया
● सुरेश हुसे

**देऊळगाव राजा :** तालुक्यातील मेंडगाव ते सावखेड नागरे रस्ता सध्या मृत्यूच्या दारात उभा आहे! सुमारे ३ कि.मी. अंतराचा हा रस्ता म्हणजे खड्ड्यांचा महासागरच जणू! नागरिक, रुग्ण, शाळकरी मुले, वृद्ध मंडळी सगळ्यांनाच रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

गेल्या कित्येक वर्षांपासून या रस्त्याचे दुर्लक्ष होत आहे. निवेदनं दिली, आर्जव केलं, पण प्रशासकीय यंत्रणांनी आणि लोकप्रतिनिधींनी डोळे झाकलेत का असा प्रश्न आता जनतेला सतावतोय.

लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मयुर गीते यांनी पालकमंत्री मकरंद पाटील यांना थेट निवेदन देत "या रस्त्यावर दररोज एखादा जीव जाईपर्यंत प्रशासन जागं होणार का?" असा थेट सवाल केला आहे.

या मागणीला गावकऱ्यांनीही प्रचंड पाठिंबा दिला असून शिवानंद काळूसे, गजानन नागरे, पवन गिते, वसंता कणखर, कुणाल काळूसे, शंतनू गिते, अक्षय घुगे या सर्वांनी एकमुखाने रस्त्याच्या नुतनीकरणाची जोरदार मागणी केली आहे. हा रस्ता नवसंजीवनीस पात्र आहे की मृत्यूचे निमंत्रण? आता बघायचं आहे, पालकमंत्री या संतप्त जनआक्रोशाला प्रतिसाद देतात का!

